ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

# Learning and Information Resource Centre




# LIRC EVENTS – JULY 2018 TO JUNE 2019

ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

**Book Bank Facility**: Book Bank Facility was extended to SE, TE and BE students on 25th July to 27th July, 2018 and to FE students on 5th September, 2018. A total 257 books were borrowed by the students out of 505 Books and Total Beneficiaries were 164 students



ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in



ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

# IN HOUSE BOOK EXHIBITION ON ACCOUNT OF INDEPENDENCE DAY FROM 14TH TO 18TH AUGUST 2018



ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

**DRAWING AND PAINTING CONTEST ON SEPTEMBER 1, 2018**



ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103


www.sfit.ac.in

**Artwork of Drawing & Painting Contest 2018**

**FIRST PRIZE WINNER - JESSICA D'SOUZA (BE CMPN A)**




**SECOND PRIZE WINNER - HARSHAD MHATRE (TE EXTC A)**




ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

**THIRD PRIZE WINNER - YOGITA LIKHI (FE CMPN A)**




**RUNNER UP: MOUSUMI HALDER (FE EXTC A)**



ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

## RUNNER UP - PURNIMA KUBDE (ASST. PROF., INFT)



ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

**Display of Technical Magazines 25th August 2018**
**Display of Electronics For You, PC Quest, DATA Quest,**
**Open Source For You**







ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

# Display Journals on 6th Sept.2018



ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

**Reading Inspiration Week 8 to 15 October 2018**

**To commemorate the birth anniversary of our Ex.President and Visionary Scientist, Late Dr.A.P.J.Abdul Kalam on 15th October, the Learning and Information Resource Centre is organizing the following activities:**

| Day | Activity |
|---|---|
| 8th -9th October, 2018 | In-House Exhibition of Books |
| 10th October,2018 | Take Away of CDs |
| 11th-12th October,2018 | Take Away of Donated Books<br>Display and Sale of Book Bank Weeded out Books |
| 15th October, 2018 | Display of books on Late Dr. A.P.J. Abdul Kalam |

**IN-HOUSE BOOK EXHIBITION 8TH AND 9TH OCTOBER 2018**



**Take Away of CDs: 10th October, 2018**

ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in



ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

Take Away of Donated Books: 11th October, 2018



ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in


## Sale of Weeded Out Books from the Book Bank: 12th October, 2018



ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

# Display of books on Late Dr. A.P.J. Abdul Kalam: 15th October, 2018






**Book Bank Facility**: Book Bank Facility was extended to FE to BE students on 14th January to 17th January, 2019. A total 315 books were borrowed by the students out of 474 Books and Total Beneficiaries were 196 students



ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in


## Display of Best Project Reports in the LIRC 23rd February 2019



ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

# CELEBRATION OF MARATHI BHASHA DIWAS 2019 - Part 1




## कुसुमाग्रज

वि.वा. शिरवाडकर यांचे खरे नांव गजानन रंगनाथ शिरवाडकर दत्तक गेल्यामुळे त्यांचे नांव विष्णु वामन शिरवाडकर झाले. २७ फेब्रुवारी १९१२ साली त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण पिपंळगाव येथे झाले. तर माध्यमिक शिक्षण नाशिक येथील न्यू इंग्लीश स्कुलमध्ये म्हणजे आजचे जे जु. स. रुंगठा विद्यालय आहे तेथे झाले. मॅट्रिक परिक्षा ते मुंबई विद्यापीठातून पास झाले.




१९३० साली हं. प्रा. ठाकरसी विद्यालयात ते होते तेव्हा 'रत्नाकर' मासिकातुन त्यांच्या कविता प्रसिध्द होत. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांना काळाराम मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून १९३२ साली जो सत्याग्रह झाला त्यात त्यांनी सहभाग घेतला होता, त्यामूळे बाल्यावस्थेतील त्यांच्या लिखाणाला प्रौढत्वाची लकाकी चढून हळूहळू त्यांच्या साहित्याने आकाशाला गवसणीच घातली. ज्यात त्यांनी फक्त कविताच नाही तर कथा, कादंबऱ्या, नाटके, ललित साहित्य याबरोबर प्रभा साप्ताहिक, प्रभात वृत्तपत्र, सारथी, धनुर्धारी व नवयुग यामध्ये पत्रकारिता पण केली. त्यांचा आवडता लेखक पी. जी. वुडहाऊस व आवडता नट चार्ली चाप्लिन होता.

१९४२ साली प्रसिध्द झालेला 'विशाखा' हा काव्यसंग्रह म्हणजे मराठी वाङमयातील उच्च कोटीचे वैभव होय. जे आजही मराठी साहित्यप्रेमींना भुरळ घालते. 'मराठी माती', 'स्वागत', 'हिमरेषा' यांचबरोबर 'ययाती आणि देवयानी' व 'वीज म्हणाली धरतीला' ही नाटके १९६० ते १९६६ साली प्रसिध्द झाली. साऱ्या साहित्य कृतींना राज्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. १९४६ साली 'वैष्णव' ही कादंबरी व 'दूरचे दिवे' हे नाटक प्रसिध्द झाले.

'नटसम्राट' ही त्यांच्या लेखणीतून उतरलेली सर्वोत्कृष्ट कलाकृती तर होतीच पण त्याचे नाटयप्रयोगही खूप गाजले. नाटयवेडया मराठी रसिकांनी त्यांचे अभूतपूर्व स्वागत केले. अत्यंत नाजुक व भावुक विषयाला हाताळणारे हे नाटक वयोवृध्दांचा दृष्टीकोन बदलणारे ठरले कारण अनेक वृध्दांनी हे नाटक पाहिल्यावर आपले मृत्यूपत्र बदलले. तरूणांचाही वृध्दांकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलला.

## कुसुमाग्रज एक वेगळं व्यक्तिमत्व

त्यांच्या साहित्य प्रवासाबरोबर माणूस म्हणून त्याचं वेगळं व्यक्तिमत्व अभ्यासायचं तर अनेक पैलूनी ते पहावे लागेल.

नाशिकमधील अनेक चळवळींचे ते प्रणेते होते. उदाहरणार्थ, त्यांनी लोकहितवादी मंडळ १९५० मध्ये सुरू केले. नाशिकच्या प्रसिध्द सार्वजनिक वाचनालयाचे ते १९६२ ते १९७२ पर्यंत अध्यक्ष होते. ते दशक वाचनालयाचे सुवर्णयुग म्हटले पाहीजे. सामाजिक वा वैयक्तिक अशा कुठल्याही प्रकल्पांना ते मार्गदर्शन करीत. कोणीही कुठल्याही प्रकारचे मार्गदर्शन मागण्यास आला तर क्षणात त्या व्यक्तीची क्षमता ओळखून ते मदत करीत. असं असूनही यश साजरं करतांना ते मागे राहणंच पसंत करत.

**साहित्यसूर्य मावळला**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात कुसुमाग्रजांच्या निधनाने जी पोकळी निर्माण झाली ती कधीच भरून निघणार नाही. नाशिककरांना तर आपल्या घरातील वडीलधारं माणूस गमावल्याचं दु:ख आहे. मानवतेचा कळवळा व मराठी भाषेवरचं प्रभुत्व यामुळेच 'नटसम्राट' व 'विशाखा' सारखे साहित्य जन्माला आले. एवढं उत्तुंग कर्तृत्व व अनेक पुरस्कारांनी सन्मानित व्यक्तिमत्व अत्यंत साधे तर होतेच पण शेवटपर्यंत अत्यंत नम्र व सत्कार्याला वाहून घेतलेले जीवन ते शेवटपर्यंत जगले. शिक्षणक्षेत्रात त्यांनी खूप मार्गदर्शन केले. आजची परीक्षा पध्दती मुलांसाठी निष्ठुर पध्दती आहे असे त्यांचे मत होते. इतरही अनेक क्षेत्रात त्यांनी लोकांना योग्य मार्ग दाखवले. त्यांचे घर म्हणजे तीर्थक्षेत्र झाले होते. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ स्थापण्यात आलेल्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानाचे समाजातील गरीब, गरजू व मागासलेल्या जनतेसाठी योगदान वाखाणण्यासारखे आहे.

Source: http://www.kusumagraj.org/kusumagraj/parichay.php (Accessed on February 28, 2019)

## CELEBRATION OF MARATHI BHASHA DIWAS 2019 in SFIT - Part 2

Marathi Bhasha Diwas was celebrated on 27 February 2019 in St. Francis Institute of Technology with great enthusiasm. Many contests were organized a week before to celebrate the occasion. Students and faculty participated in the recitation of their poems at a get-together in the Assembly Hall of the Institute.

Details of the participants for every segment of the contest is as follows:

Spin a Story Contest with 100 words:

1) प्रथमच..! by Asst. Prof. Sunil Pansare (In-Charge HOD, Mechanical Engineering)
2) निरोप..! by Asst. Prof. Sunil Pansare (In-Charge HOD, Mechanical Engineering)
3) खरा मानकरी by Asst. Prof. Sunil Pansare (In-Charge HOD, Mechanical Engineering)
4) विसाव्या शतकातील आनंदी by Tanmayee Gosavi (TE-ExTC A)

Pen a Poem:
1) एक होता पाकिस्तान by Vaibhavi Naik (TE-ExTC B)
2) मायबोली मराठी by Mr. Raheem Sayyad (Library Attendant)
3) कितीदा नव्याने तुला आठवावे by Ankush Patil (BE-ExTC B)
4) आई by Asst. Prof. Pradnya Rane-Sawant (Computer Engineering)
5) मैत्री म्हणजे......!! by Prof. Dr. Kavita Sonawane (HOD, Computer Engineering)
6) बाजार by Sumukh Maduskar (TE-CMPN B)
7) जास्त त्रास कशाचा? by Vibha

Face-A-Book:
1) श्री. अच्युत गोडबोले यांचे मुसाफिर by Ms. Yashada Agarkar (Laboratory Asst., Electronics and Telecommunication Engineering)

Cook it up:
1) खांडवी by Ms. Sucheta Prabhudesai (Asst. Librarian)
2) ठिकरीची आमटी by Natasha Shinde (BE-ExTC B)
3) मांसवडी by Asst. Prof. Dr. Vaishali Jadhav (Information Technology)

Marathi Personalities:
1) महाराष्ट्र भूषण: डॉ नानासाहेब धर्मादिकारी by Mr. Vishal Acharekar (Laboratory Asst., Mechanical Engineering)


Alongwith the above contests, a book exhibition of Marathi books was organized in the Library.
Also, a page "Maharashtra Times: Pahile Paan (पहिले पान)" dedicated to Review of Books was created on our blog. This page contains reviews of books published in Maharashtra Times e-paper.

ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in



महाराष्ट्र भूषण "डॉ नानासाहेब धर्मादिकारी" यांचा जन्म रायगड जिल्ह्यातील रेवदंडा या गावी १ मार्च १९२२ रोजी झाला. जसा पूर्वेकडून अरुणोदय झाला कि संपूर्ण जग काळोख व दु:खावर मात करण्यासाठी प्रकाश व सूर्यकिरणांची वाट पाहत असते. डॉ नानासाहेब धर्मादिकारी रुपी सूर्याचा जन्म माणसांच्या मनातील अज्ञान,अंधकार,अंधश्रद्धा दूर करण्यासाठीच झाला.सामाजिक क्षेत्रात ज्ञानाचा बीज रोवण्याचा बाणा त्यांचा पूर्वजांपासूनच चालू आहे.दसऱ्याचा मुहूर्तावर १० ऑक्टोबर १९४३ रोजी नानासाहेबांनी त्यांचा सामाजिक कार्याचा पाया "डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान" या रूपाने आत्मीयता व निष्ठेने रोवला.त्यांनी बैठकांच्या माध्यमातून आपल्या निरूपणाने संपूर्ण जगभर समाज प्रभोधनाचे कार्य केले व ते कार्य आजही भारत,यु ए ई,लंडन,सिंगापूर,ऑस्ट्रेलिया,नायजेरिया व अधिक देशामध्ये चालू आहे." देशाने आपल्यासाठी काय केले हे बघण्यापेक्षा आपण देशासाठी काय करतो. " हे विचार कितेक लहान मुले , पुरुष व स्त्रियांमध्ये बैठकीच्या माध्यमातून केले जाते. तसेच पर्यावर संरक्षण,वृक्षारोपण व संवर्धन,स्वच्छता अभियान,जलस्रोतातील गाळ काढणे,पाणी आडवा पाणी साठवा मोहीम, २० डिसेंबर २०१३ रोजी गिनीस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये समाविष्ठ झालेले आरोग्य शिबीर,शाळकरी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,श्रवणयंत्र वाटप,ठिकठिकाणी बस थांबे व पाणपोई इत्यादी क्षेत्रात कायम रुजू असलेले प्रतिष्ठान स्त्रियांचे सक्षमीकरण,प्रौढ साक्षरता,लहान मुलांसाठी प्रशिक्षण केंद्रे यासारख्या अनेक समाजउपयोगी कार्यात अग्रेसर आहे. हाच सामाजिक बदल पाहून अनेक सामाजिक, अधिकृत, राजकीय संस्थांनी वेळोवेळी रायगड भूषण (१३ मे १९९३), महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार (२९ जुन १९९७), राष्ट्रीय एकीकरण पुरस्कार (१६ मे १९९९), श्री समर्थ रामदास स्वामी पुरस्कार (१८ मे १९९९), शिव समर्थ पुरस्कार (१५ नोव्हेंबर १९९९), संत श्री ज्ञानेश्वर पुरस्कार (०१ डिसेंबर २०००), बहिणाबाई प्रतिष्ठान पुरस्कार (१८ डिसेंबर २०००), गुजराती महाजन भूषण पूरस्कार (१७ नोव्हेंबर २०००), महाराष्ट्र गौरव पुरस्कार (३० एप्रिल २००१), समाज भूषण पुरस्कार (०१ मार्च २००२), शिवराज प्रतिष्टान पुरस्कार (३१ जानेवारी २००३), सामाजिक प्रभोधन पुरस्कार (१२ मे २००३), दि लिट पदवी (०७ फेब्रुवारी २००४), महर्षी व्यास पुरस्कार (११ डिसेंबर २००७), महाराष्ट्र भूषण (३० एप्रिल २००८) असे पुरस्कार देऊन कार्याचा सत्कार केला. " अज्ञान मुलं हरणं " याच ब्रिदवाक्यासोबत हि सामाजिक संस्था जनमानसांत मन परिवर्तन तसेच समाजावर असलेल्या ऋणाची जाणीव करून देते.



मांसवडी
( पुण्यातील पारंपारिक पाककृती )

( वडी सारण )

साहित्य :
1) पांढरे तीळ - 1 वाटी
2) शेंगदाणे - 1 वाटी
3) सुके खोबरे - 1 वाटी
4) काळी मिरी - 7/8
5) लवंग - 7/8
6) खसखस - 2 चमचे
7) कडिपत्ता - 2 चमचे
8) दालचिनी - 3/4
9) लाल तिखट - 1 चमचा
10) मीठ - चवी नुसार
11) लसूण - अर्धी वाटी (सोललेला)

कृती : वरील साहित्य चांगले भाजून मिक्सर वर बारीक करून घेणे. वडी सारण तयार करुन घेणे.

VAISHALI JADHAV

( वडी आवरण )

साहित्य : 1) तेल - 2 चमचे
2) पाणी - 2 ग्लास
3) लाल तिखट - 1 चमचा
4) मीठ - चवी नुसार
5) हळद - 1 छोटा चमचा
6) चण्याचे पीठ - 2 ग्लास पाण्यात टाकण्याजोगे.

कृती : दोन ग्लास पाण्यात तेल, हळद, तिखट, मीठ घालून उकळून घ्यावे. उकळत्या पाण्यात हळूहळू चण्याचे पीठ घालावे. गुठळी न होता पीठ शिजवावे. एका रुमालावर शिजवलेले पीठ गोलाकार थापून घेणे. त्यावर वरील तयार केलेले सारण गोलाकार पसरावे. रुमालासहित आवरण आणि सारण यांची गुंडाळी करावी. गुंडाळीला त्रिकोणी आकार दयावा. रुमाल काढून घ्यावा. त्यावर कापलेल्या मांसवड्या तेल टाकून हलक्या तळाव्यात.

आवरण
सारण

## एक होता पाकिस्तान

काश्मिरसाठी भांडणारा;मागून वार करणारा,
जिहादच्या नावाखाली आतंकवाद चा प्रचार
करणारा,
एक होता पाकिस्तान...
गोळीबार करणारा; शस्त्रास्त्रांचा सहारा घेणारा,
जातीचा मान ठेवत असताना माणुसकी
विसरणारा,
एक होता पाकिस्तान...
जिंकण्याचे लक्ष ठेवणारा;रणभूमीवर मात्र माती
खाणारा,
देशाचे भवितव्य घडवण्या ऐवजी लहान जीवांना
आतंकवाद च्या विळख्यात अडकवणारा,
एक होता पाकिस्तान...
दुजाभाव करणारा; विनाशाचे कारण बनणारा,
अस्तित्वात असूनही जिवंत मरणारा
एक होता पाकिस्तान...

- वैभवी नाईक
(T.E. Extc-B)

## विसाव्या शतकातील आनंदी

(चित्रपट आनंदी गोपाळ यातील बक्षिस वितरण सोहळ्यात शेवटचा प्रसंग)

.... लख्ख अंधार, सर्वत्र पसरलेली शांतता, वेळीस डोळ्यात पाणी, आतुरलेले कान ते फक्त आणि फक्त रेकमेव नाव रेकण्यासाठी आणि ते होतं डॉ. आनंदी गोपाळ!! आणि ते नाव कानावर पडताच क्षणाधात आपण केलेल्या चूकांचा आणि त्या चूकांच्या आधारावर पुढे जाण्याचा संदर्भ मनाला भेडसावून बोलांः

दिवे लागले आणि डोळ्यासमोर फक्त होत्या त्या विसाव्या शतकातील आनंदी .... आनंदी गोपाळ। ज्यांनी अनेक प्रश्नांबद्दल विचार करण्यास भाग पाडले कि का स्त्री ला तेव्हाच स्विकारले जेव्हा ती स्वतःला सिद्ध करुन दाखविते? अद्यापही तिला का कमी समजले जाते? स्त्रीशी निगडीत घटना केव्हा थांबतील?

तर ही परिस्थिती तेव्हाच सुधारेल जेव्हा मुळात स्त्री ह्या जातीचा स्विकार होईल, आदर होईल.

TANMAYEE GOSAVI

## खरा मानकरी

"मी तुम्हा सर्वांवर शस्त्रक्रिया केल्या हि गोष्ट खरी पण तरीसुद्धा या प्रेमाचा, गौरवांचा खरा धनी मी नव्हे! मी फक्त शस्त्रक्रिया केल्या, तेही पैसे घेऊन!" डॉक्टर देशमुखांच्या या उद्गारांमुळे सभागृहात जमलेल्या जवळजवळ अडीचशे तरुण-तरुणींच्या चेहऱ्यावर गोंधळ दिसू लागला.
डॉक्टर म्हणाले, " या स्नेहाचे, प्रेमाचे खरे मानकरी आहेत प्राध्यापक टिपणीस" त्यांनी निर्देश केलेल्या दिशेने सर्वजण पाहू लागले. "मला खूप मेहनत घ्यावी लागली सरांना शोधण्यासाठी... त्यांनीच पुढाकार घेऊन तुम्हा सर्व मुलांना, ज्यांना रक्तातला कॅन्सर होता, शोधून काढलं आणि माझ्यामार्फत तुमच्यावर ईलाज करवला. त्यांनी आयुष्यभर कमावलेली संपत्ती तुमच्यासाठी खर्ची घातली."
एकीकडे सत्तरीतील ते सर भांबावलेले दिसत होते तर दुसरीकडे टाळ्यांचा प्रचंड कडकडाट चालू होता!

SUNIL PANSARE

## निरोप..!

बाप्पा... आता कसं होणार आपलं? काळजीने ओतप्रोत भरलेला एक प्रश्न कानावर पडला ...
माझं लक्ष गेलं... एक वयस्कर जोडप त्यांना पुढचं विमान कुठे आणि कधी मिळेल हे विचारायचा अगतिक प्रयत्न करत
होते!
मी त्यांच्याकडे गेलो आणि म्हणालो घाबरू नका मी तुम्हाला मदत करेन. त्यांचा चेहरा आनंदाने भरून गेला. त्यांनी
सांगितलेल्या फोन नंबर वर मी कॉल केला. त्यांची मँचेस्टर मध्ये राहणारी मुलगी गडबडून गेली माझ्या कॉलमुळं पण
स्वतःला सावरत त्यांनी विमानासंबंधी माहिती सांगितली आणि मी फोन ठेवला. मग तिथल्या अधिकाऱ्याला सांगितलं
काका-कांकींबद्दल... तो म्हणाला डोन्ट वरी, वी विल टेक केर ऑफ देम!
काका-काकींना निरोप देताना हृदय भरून आलं माझं..... आणि त्यांचंपण!

SUNIL PANSARE

**प्रथमच..!**

"तुम्ही आयसी कॉलनी मध्ये राहता?"
मराठी? रात्रीच्या ११ वाजता लंडन ट्यूबच्या डिस्ट्रिक्ट लाईन मध्ये?
अनपेक्षित सुखद धक्क्यानं हैराण होऊन मी त्या प्रश्नकर्त्या गृहस्थाकडे पाहिलं!
तसं समोरच कुटुंब भारतीय वाटत होत खरं! पण म्हणजे ... एकदम मराठी आणि तेपण..... आयसी कॉलनी? हे जरा अतीच झालं माझ्यासाठी!
माझा बावळट झालेला चेहरा पाहून ते गृहस्थ हसत हसत म्हणाले, "अहो तुमच्या सुटकेस वरची नेमप्लेट वाचली मी ! माझं सगळं बालपण बोरिवलीच्या एलआयसी कॉलनी मध्ये गेलंय. सध्या मी डेन्मार्कमध्ये राहतो. आत्ताच लंडनला आलोय उन्हाळी सुट्ट्यांमध्ये!"
आयसी- एलआयसीकर आयुष्यात प्रथमच भेटत होते...कुठे? तर लोकल मध्ये... लंडनच्या!
साधारण प्रसंग खरा पण आठवला म्हणजे मज्जा वाटते अजूनही !

SUNIL PANSARE

ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

**बाजार**

एकतर्फी प्रेमाचा बाजार
प्रेम करतोस ना तिच्यावर,
मग कर फक्त प्रेमाचा वर्षाव
तिने ही करावं प्रेम म्हणून
आणायचा नसतो दबाव....

असेल तिचा नकार, तर
तोही तू हसत स्वीकार
तिलाही आहे स्वत:चा
निर्णय घेण्याचा अधिकार...

नाही म्हणाली तर तुझ्या
प्रेमाने नकाराला होकारात बदल
का नाही म्हणाली याचा विचार
करुन आधी स्वत:ला बदल...

नाही म्हणाली तर तिच्या
नकारावरही प्रेम करावं
नाही म्हणता म्हणता तिला
प्रेम करायला शिकवावं...

नको रे [illegible] तुझ्या वेड्या
हट्टापायी तिचा बळी
काय मिळणार तुला तोडून
एखादी उमलणारी कळी...

खरे प्रेम करतोस ना,
मग ठेव योग्य नीती
कशाला दाखवतोस उगाच
तिला जीवाची भीती...

तुझे हे खरे रुप पाहून
कदाचित बदलेल तिचा विचार
तिलाही होईल बघ मग
तुझ्या प्रेमाचा आजार...

अखेर तरीही नसेल तिचा होकार
तर तूसुद्धा घे अवश्य माघार
कशाला मांडतोस लेका असा
एकतर्फी प्रेमाचा बाजार...

सुमुख संदीप मादुस्कर
तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी - ब वर्ग
क्रमांक ६०
( PID - १७२२७०)

SUMUKH SANDEEP MADUSKAR

## खांडवी

साहीत्य : १ वाटी इडली रवा , १ १/२ वाटी गूळ ,पाव वाटी साखर ,३ वाट्या पाणी , २ चमचे तूप ,१ वाटी ओले खोबरे , वेलची पूड २ चमचे, मीठ चवीपुरते, वड्या पाडण्यासाठी १ ताट

कृती : प्रथम कढई मध्ये १ वाटी इडली रवा तुपावर चांगला तांबूस होई पर्यन्त भाजणे . नंतर एका पातेल्यामधे तीन वाट्या पाणीघेऊन त्यामध्ये १ १/२ वाटी गूळ आणि पाव वाटी साखर घालून पाणी गरम करण्यासठी गॅसवर ठेवणे . पाणी उकळायला लागले की त्यामध्ये ,१/२ वाटी ओले खोबरे , वेलची पूड २ चमचे , मीठ चवीपुरते घालणे . नंतर भाजलेला इडली रवा घालणे. गॅस बारीक ठेऊन त्यावर झाकण ठेवणे.    मिश्रण मधून - मधून ढवळत राहणे, ताटाला तूप लावून इडली रवा शिजला की सर्व मिश्रण त्या ताटामध्ये घालून त्यावर१/२ वाटी ओले खोबरे पसरणे  आणि  छान वड्या पाडणे.

## मुसाफिर

मराठीत अनेक आत्मचरित्र , स्वानुभवपर आधारित लिखाण प्रसिद्ध झाले आहे.
अगदी चर्चिल, गांधी पासून गावकुसाबाहेरील माणसापर्यंत. याच मालिकेतले आणखी एक पुस्तक म्हणजे श्री. अच्युत गोडबोले यांचेलिहिलेले मुसाफिर हे पुस्तक. मनोविकास प्रकाशनाचे हे पुस्तक आहे केवळ ४५०-५०० पानांचे हे पुस्तक असून अत्यंत माफक किमतीत हे एक वाचनीय पुस्तक वाचकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल
प्रकाशानेही आभार. इतर आत्मचरित्राप्रमाणे याही पुस्तकात एका यशस्वी माणसाची यशोगाथा वाचावयास मिळते. परंतु हे पुस्तक अनेक बाबतीत वेगळं ठरते.
बालपण त्यानंतर, आय.आय. टी ते आय टी. तज्ञ पर्यंतचा प्रवास , एका ऑटीस्टिक मुलाचा बाप ,लेखक असे टप्पे त्याच्या आयुष्यात आले आहेत. या सगळ्या काळात ते आयुष्य आहे तसं स्वीकारून, परिस्थितीवर मात करून ,जगण्याला सामोरे जातात. मनापासून जगतात. एखाद्या roller coaster सारखं त्यांचं आयुष्य आहे. एकाच
आयुष्यात अनेक टोकाच्या घटना,भावनानांना त्यांच्या वाट्याला येतात. पुस्तक वाचताना आपणही या प्रवासाचा भाग कधी होतो हे आपल्याला कळतही नाही. कर्तृत्ववान YASHADA AGARKAR
माणसाच्या ठिकाणी असणारे अनेक गुण त्यांच्याकडे आहेत. बुद्धीमत्ता , अपार परिश्रम घेण्याची वृत्ती , सकारात्मक वृत्ती. पण तरीही ते आपल्याला जवळचे वाटतात. आपल्यातील एक वाटत राहतात. आपल्याला पडणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरेही मुसाफिर वाचताना आपल्याला मिळतात ते मुसाफिर पुस्तकातील लिखाणामुळे. त्यांची अकृत्रिम विनम्र वृत्ती आणि नैसर्गिक शैली या मुळे. अच्युत गोडबोले यांनी मराठीत इतरही अनेक पुस्तके लिहिली आहेत. ती वाचताना काही वेळा जरा क्लिष्ट वाटतात. परंतु या पुस्तकाची शैली मात्र अत्यंत प्रवाही आहे आपण आयुष्यात केलेल्या चुकांबद्दलही ते मोकळे पणाने लिहितात. यशाचा काही formula नसतो. 'out of the box' विचार करण्याची वृत्ती त्यांच्या या पुस्तकात पदोपदी जाणवते . मुसाफीरमध्ये ऑटीझम बदल ते त्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने लिहिले आहे. म्हणूनच मुसाफिर हे आत्मचरित्र केवळ एका व्यक्तीचे नाही तर त्याला अनेक सामाजिक, शैक्षणिक आणि वैश्विक संदर्भ जोडले गेले आहेत.
स्त्री असो की पुरुष आणि लहानांपासून- थोरांपर्यंत समाजातील प्रत्येकानेच वाचावा , संग्रही ठेवावा असा हा त्यांच्या आयुष्याचा पट आहे. निराशेच्या क्षणी बळ वाढवणारा , परिश्रमाची माहिती सांगणारा असा. अर्थकारण, संगीत, मानसशात्र, तंत्रज्ञान अशा विविध विषयात मुक्त मुसाफिरी करणाऱ्या गोडबोल्यांनी आपल्या आत्मचरित्राला मुसाफिर ; हे अत्यंत समर्मक नाव दिले आहे. अल्पावधीतच हे पुस्तक अत्यंत लोकप्रिय झाले आहे. ३०,००० प्रतींकडे घोडदौड करत आहे.या पुस्तकास पारितोषिकेही मिळावीत अशी शुभेच्छा देते.

ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

## मायबोली मराठी

मायबोली ही मराठमोळी
महाराष्ट्रा आन,महाराष्ट्राची शान
सर्वांच्या मनात रुजणारी
अशी ही आमची साधी -भोळी
मराठी असे आपुली मायबोली
शिवरायांची जन्मभूमी
मराठ्यांची कर्मभूमी
संतांची मधुर अभंगवाणी डोंगर-
दऱ्यातून,कानाकोपऱ्यात
प्रचलित अशी माझी लाडकी मराठमोळी
मराठी असे आपुली मायबोली
मराठीचा आहे आम्हांस अभिमान
सळसळत्या रक्ताला प्रेरणा देणारी
अन्याया विरुद्ध लढण्याची बाळकडू पाजणारी
वाघाची डरकाळी आणी सिंहगर्जना करत
परकीय शत्रुंना वचक दावणारी
सर्वच भाषांमध्ये वरचढ राहणारी
मराठी असे आपुली मायबोली

**RAHEEM SAYYED**

### आई.

शब्दच असा..
ज्याचा सर्वांच्या जीवनात ठसा..

तिनेच घडवलं..तिनेच शिकवलं..
तिनेच निभावलं..
आणि या वळणावर आणून ठेवलं..

तिच्या सावलीत वाटली नाही..
कसलीच आस..
दुसऱ्यांना  भरभरुन देण्याचा..
एकच होता ध्यास..

एकच खंत..मुलीचा जन्म मिळाल्याची..
लग्न झाल्यावर..तिचा सहवास सोडावा लागण्याची


आता आनंद..स्वतः आई झाल्याचा..
तिचं जीवन..अनुभवायला मिळाल्याचा..

तिच्या चिंता, तिच्या कसोट्या..
सगळ्याचे धागे-दोरे मिळाले..
आई शब्दाचे महत्व, पुन्हा एकदा उलगडले

प्रयत्न इतकाच..तिच्या मार्गावर चालण्याचा..
स्वतःकडे काहीही न ठेवता..सगळे दुसऱ्याला देण्याचा


तिची शिकवण..अशीच पार पाडणार..
आठवणीत जपलेले मात्र...तिचेच बोल..
आई झाल्याशिवाय..तुला नाही कळणार!!!

प्रज्ञा राणे-सावंत


Natasha Ravindra Shinde
BE-EXTC/B
NATASHA SHINDE

ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in



**मैत्री म्हणजे......!!**

क्षणिक चिडणारी, सगळ्यांच्या जीवनात आनंद भरणारी
मैत्री म्हणजे...."प्रज्ञा"
बुद्धिमत्तेची अलंकारीक "संज्ञा"

प्रेम देणारी, प्रेमाने ओसंडून वाहणारी
मैत्री म्हणजे...."अंजली"
जणू सौंदर्याने भरलेल्या परिपूर्ण "ओंजळी"

क्षणिक रागावणारी, तरीही सगळ्यांना सांभाळणारी
मैत्री म्हणजे.... "दक्षता"
फक्त जिच्याकडे आहे सगळ्यांची काळजी घेण्याची "क्षमता"

सारखी भावनिक होणारी, नेहमी गोड हसणारी
मैत्री म्हणजे...."वंदना"
मितभाषेने जपते जी सगळ्या "ऋणानुबंधाना"

मस्ती करणारी, खळखळून हसणारी
मैत्री म्हणजे...."वैशाली"
बिनधास्त जगायला शिकवणारी ती एक "जीवन शैली"

नकारात्मकता दूर सारुन, सकारात्मकता मांडणारी
मैत्री म्हणजे...."कविता"
सगळ्यांच्या भावनांना सामावून घेणारी सहज सोपी "व्यक्तता"

कविता सोनावणे.

ST. FRANCIS INSTITUTE OF TECHNOLOGY
(ENGINEERING COLLEGE) BORIVALI WEST,
MUMBAI 400103

www.sfit.ac.in

कितीदा नव्याने तुला आठवावे
जुन्या आठवणींच्या पुस्तकात रमावे!

जुन्या नव्या गोष्टींची मैफिल मग सजावी,
माझे बोलणे आणि तुझे फक्त ऐकणे असावे!

भावनांच्या वादळात स्वतःला गुरफटुनी घ्यावें,
अन मग अश्रुंचे दोन थेंब तुझ्याच सामोरी पडावे!

ढासळलेल्या मला तुझ्या दिलास्याचा आधार मग मिळावा
अन माझ्याच प्रयत्नांवर तुझ्या कौतुकाची थाप ती पडवी!

जखमेवर माझ्या उबदार प्रेमाची मलमपट्टी व्हावी
अन आपुल्याच स्वप्नांच्या बागेत आपलीच जत्रा फुलावी!

निरोपाची वेळ येताच ठोका हृदयाचा चुकवा,
क्षणभर मग तुझ्याभोवतीच फिरावे
अन क्षणभंगुर आनंद घेऊन वास्तवात परतावे!

---Ankush Patil

ANKUSH PATIL